# एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई

## ७०वा दीक्षांत समारोह

## वृत्त प्रकाशन

**मुंबई**
**१७ फेब्रुवारी, २०२१**

एस.एन.डी.टी. महिला विद्यापीठाचा ७० वा दीक्षांत समारोह दिनांक १७ फेब्रुवारी, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सर सीताराम आणि लेडी शांताबाई पाटकर दीक्षांत सभागृह, चर्चगेट येथे साजरा झाला. करोना साथीच्या पार्श्वभूमीवर आणि सामाजिक अंतराच्या नियमानुसार फक्त पारितोषिक विजेत्या विद्यार्थीनींची उपस्थीती होती. इतर विद्यार्थीनीनी हया समारोहाचे www.estv.in/sndt या लींकवर थेट प्रक्षेपण पाहीले.

या दीक्षांत समारोहात एकूण १६४८५ पदवीधर विद्यार्थीनींना पदवी / पदवीका प्रदान करण्यात आल्या. यात स्नातक (बॅचलर डिग्री) पदवीचे (१३७७८) प्रमाण सर्वाधिक असून, स्नातकोत्तर (२०७५), स्नातकोत्तर पदविका (१९९) पदविका प्रमाणपत्र (४०४) आणि २९ पीएच.डी. च्या विद्यार्थीनी होत्या. एकूण १२० विद्यार्थीनींना मिळून ७३ सुवर्णपदक, २१८ रौप्यपदके व २१८ बक्षिसे देण्यात आली. यात १०५ पदवी आणि पदविका चार विद्याशाखांच्या अंतर्गत (विज्ञान व तंत्रज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापन, मानविकी आणि अंत:विषय अभ्यासक्रम) प्रदान करण्यात आल्या.

हे विद्यापीठ बहूभाषिक पार्श्वभूमी असलेल्या विद्यार्थीनींना शिकवते आणि या समारोहात ११५४५ इंग्रजी माध्यमातील, ३६०३ मराठी माध्यमातील, ७९४ हिंदी माध्यमातील, ५०० गुजराती माध्यमातील व ४३ उर्दू माध्यमातील विद्यार्थीनीनी पदव्या स्विकारल्या.

विद्यापीठाच्या कुलगुरू प्रा. शशीकला वंजारी यांनी उपस्थीतांचे स्वागत करून दीक्षांत अहवाल सादर केला. त्यांनी विद्यापीठाच्या करोनाकाळातील कामगीरीचा आढावा घेतला आणि ऑनलाईन शिक्षण अभ्यासक्रम व परीक्षा यशस्वीरीत्या राबवल्याबद्यल सर्व प्राध्यापक वर्ग, कर्मचारी व अधीकारी वर्गाची प्रशंसा केली. त्यांनी यशस्वी पदवीधर विद्यार्थीनींना आगामी काळातील यशासाठी शुभेच्छा दिल्या.

समारोहाचे माननीय प्रमुख पाहुणे श्री मुकुल कानीटकर (राष्ट्रीय संघटन सचिव, भारतीय शिक्षण मंडळ) यांनी दीक्षांत समारोच्या भाषणात पदवीधर विद्यार्थीनींना जीवनात नविन लक्ष्य घेऊन पुढे जाण्यासाठी शुभेच्छा दिल्या. या विद्यार्थीनींनी 'ज्ञानार्थ प्रवेश' घेतला होता, आता पदवी प्राप्तीनंतर 'सेवार्थ प्रस्थान' करतांना युगपरीवर्तनाकरता सज्ज होऊन येणाऱ्या काळात जीवनाची दिशा कोणती असावी आणि परीवार, समाज व राष्ट्राला काय द्यावे याचा संकल्प करावा अशी अपेक्षा व्यक्त केली.

समारंभाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती श्री भगतसिंह कोश्यारी यांनी सर्व विद्यार्थीनीचे अभिनंदन केले. त्यांनी राजभवनातून थेट प्रक्षेपणाद्वारे या समारोहाचे अध्यक्षस्थान भूषवीले. प्र—कुलगुरू, श्री. विष्णु मगरे यांनी राजभवनावर जाऊन वैयक्तीकरीत्या कुलपतींचे स्वागत केले. राजभवनातून अध्यक्षीय भाषण करताना श्री भगतसिंह कोश्यारी यांनी करोना काळातील विद्यापीठाच्या यशस्वी कामाबद्यल सर्वांचे कौतूक केले. सर्व पदवीधर विद्यार्थीनीचे अभिनंदन करताना त्यांच्यातील मातृत्व भावाला आवाहन करून या विद्यार्थीनींनी सेवाभाव व राष्ट्रकार्य यांची सांगड घालावी अशी अपेक्षा व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. सुभाष वाघमारे, संचालक, परिक्षा आणि मुल्यमापन मंडळ यांनी बक्षिसे घोषित केली आणि आभार प्रदर्शन केले.